



REGISTERED No. B. 3434

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख ४ जानेवारी, १९५० | अंक १


## भोर स्टेट बँक लि.

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६७,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द्. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंदुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्ष मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरी ५१५ बुधवार } अधिक माहितीसाठी लिहा.
रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.



( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली मागीदारांची जबाबदारी मर्यादित )

## दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँककडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन. — के. डी. शिराळकर मॅनेजर



## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखाः—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी



## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

पांच हॉर्स पॉवरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.

## विविध माहिती

**न्यूयॉर्कला हिंदी हत्तींची देणगी**— न्यूयॉर्कमधील प्राणि संग्रहालयाला दोन हत्तींची देणगी देण्याचें जवाहरलाल नेहरू ह्यांनीं कबूल केलें आहे. हे हत्ती प्रथम मुंबईहून लंडनला विमानानें नेण्यांत येतील आणि नंतर बोटीनें न्यूयॉर्कला नेण्यांत येतील. हत्तींचा विमानांत सुलभ प्रवेश व्हावा म्हणून विमानाचीं दारें मोठीं करण्यांत येत आहेत.

**अमेरिकन प्रवाशांचे शोक**—पश्चिम युरोपांत मौजेनें प्रवास जाणाऱ्या अमेरिकन मुसाफरांचें लक्ष नाट्यगृहें आणि इमारतींचे शिल्प ह्या दोन बाबींकडे सर्वांत अधिक असतें. त्यांच्या खालोखाल पदार्थसंग्रहालयें, संगीताच्या मैफली, मैदानी खेळ ह्या विषयांची आवड प्रवाशांत दिसून येते. फ्रान्समधील अत्तरें व तेलें हे प्रवासी खूपच विकत घेतात. त्याच्या खालोखाल अनुक्रमें स्वित्झर्लंडचीं घड्याळें, फ्रेंच आणि इटालिअन हातमोजे, इटलींतील चामड्याच्या वस्तू इत्यादींचा शोक दिसून येतो.

**सुएझ कालव्याची सुधारणा**—सुएझच्या कालव्यांतील वहातूक अधिक जलद आणि सुलभ व्हावी म्हणून 'फरूक कॅनाल' नांवाच्या एका छोट्या कालव्याच्या खोदकामाला प्रारंभ झाला आहे. हा नवीन कालवा ६ मैल लांब आणि १'१० फूट रुंद होईल. सध्या बोटींना कांहीं वेळा बाजूला उभें रहावें लागते आणि त्यांचा वेगही ताशीं १४ किलोमीटर पेक्षा अधिक असूं शकत नाहीं. नवीन कालवा पुरा झाल्यावर ह्या दोन्हीं अडचणी दूर होतील.

**अमेरिकेला पाण्याचा तुटवडा पडणार?**—अमेरिकन नागरीक पाण्याचा उपयोग सध्या इतक्या मुक्त हस्तानें करतील तर लवकरच पाण्याचा तुटवडा पडेल असें अमेरिकन भूस्तर शास्त्रज्ञांचें मत आहे. पाटबंधाऱ्यांच्या योजना आणि हवा सुसह्य ठेवणें, ह्या दोन गोष्टी पाण्याच्या दुर्भिक्षाला कारण होतील, असें ते म्हणतात.

**१८५७ च्या बंडाचे पडसाद**—बिहारचे मुख्य प्रधान श्री. श्रीकृष्ण सिंह ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, १८५७ सालच्या बंडाशीं संबंध ठेवल्याबद्दल ज्या लोकांची मालमत्ता जप्त करण्यांत आली होती, त्यांच्या वंशजांना सरकार योग्य ती आर्थिक मदत करणार आहे.

**सुरत शहरांत सुताचा अपुरा पुरवठा**—सुरत शहरांत गेल्या चार महिन्यापासून हातमागाला लागणाऱ्या जाडयाभरड्या सुताचा पुरवठा अत्यंत अपुरा पडत आहे. हिंद सरकारच्या सध्याच्या निर्यात-विषयक धोरणामुळें हातमागावरील मालाच्या परदेशी बाजारपेठा धोक्यांत येत आहेत, असें सुरत चेंबर ऑफ कॉमर्सनें सरकारला कळविलें आहे.

X·2m, N35
70

**मद्रास प्रांतांतील प्रौढ शिक्षण**—मद्रास सरकारनें शिक्षणासाठीं एक पुरवणी योजना अंमलांत आणण्याचें ठ आहे. ह्या योजनेसाठी चालू वर्षी १,५०,००० रुपये खर्च ण्यांत येणार आहेत. योजनेप्रमाणें प्रौढांना साक्षर करण ५०० शाळा तावडतोब निघावयाच्या आहेत. प्रत्येक र झालेल्या प्रौढामागें १ रुपयाचें बोनस सरकारनें मंजूर केलें ३

**चिनीमातीच्या भांड्याची माती**—उत्तर आसाममधील रस्त्याच्या आसपास कपबशा आणि चिनीमातीचीं इतर भ तयार करण्यास योग्य अशी विविध प्रकारची माती सांप आहे. ह्या मातीपासून तयार केलेल्या विटा, कौलें इत्यादि व भूकंपाच्या धक्यांसही दाद न देणाऱ्या होतील असें सरक तज्ज्ञांचें म्हणणें आहे. आसाममधील चहाच्या मळ्यांना राह घरें पुष्कळच लागतील. फक्त ह्या घरांची मागणी लक्षांत घेतली त सुद्धा चिनीमातीच्या वस्तूंचा कारखाना आसामांत चालूं शके

**शिखांची वेगळ्या सुट्यांची मागणी**—मुंबईमध्यें रहाणाऱ्या ५ लाख शिखांच्या खालसा सभेनें एक ठराव करून गुरु नान ह्यांच्या जन्मदिनानिमित्त १९५० सालीं स्वतंत्र सुट्टी देण्यांत यावी अशी विनंती मुंबई सरकारला केली आहे. शिखांखेरीज इत जातींच्या लोकांसाठी सार्वजनिक सुट्या देण्यांत आल्या असल्याचें ठरावांत नमूद करण्यांत आलें आहे. गुरु गोविंदसिंग ह्यांच्या जन्मदिनानिमित्तही सुटीची मागणी करण्यांत आली आहे.

**मुसलमान राष्ट्रांसाठी बँक**—पाकिस्तानमधील एक प्रमुख बँक सर्व मुसलमानी राष्ट्रांतून आपल्या शाखा उघडण्याचा विचार करीत आहे. बहुतेक सर्व मुसलमान राष्ट्रांनीं ह्या कल्पनेचें स्वागत केल्याचें समजतें. ह्या प्रमुख बँकेंत परकीय मुसलमान राष्ट्रांनीं भांडवल गुंतवावें असेही प्रयत्न करण्यांत येत आहेत; त्याचप्रमाणें परदेशी मुसलमानी बँका पाकिस्तानांत आपल्या शाखा काढण्याचाही संभव आहे.

**यांत्रिक नांगरांचें उत्पादन**—हिंदुस्थान सरकारच्या शेतकी खात्याच्या आमंत्रणावरून यांत्रिक नांगरांचे तीन जर्मन तज्ज्ञ सध्या हिंदुस्थानांत आले आहेत. त्यांचा सरकारशीं एक वर्षाचा करार आहे. हिंदुस्थानांत यांत्रिक नांगर तयार करणें आणि त्यांच्या दुरुस्तीची व्यवस्था करणें, अशीं दोन कामें त्यांनीं करावयाचीं आहेत.

**विजेच्या दिव्यांचा कारखाना**—म्हैसूर सरकारनें एक हुकूम काढून म्हैसूर लँप वर्क्स लि. ही कंपनी आपल्या नियंत्रणाखालीं घेतली आहे. कारखाना कायमचा ताब्यांत घेऊन चालविण्याचा मात्र सरकारचा विचार नाहीं. सरकारला इष्ट वाटल्याबरोबर तो परत भागीदारांच्या हवालीं करण्यांत येईल. अर्थात भांडवलांत कांहीं सरकारचे भागही रहातील. म्हैसूर संस्थानांत विजेच्या उत्पादनाच्या वाढीच्या ज्या योजना आखण्यांत आल्या आहेत त्यास अनुसरून विजेच्या दिव्यांचें उत्पादनही वाढविण्यास हवें असें सरकारचें मत आहे.

**उत्पादन वाढविण्याची एक नवीन तऱ्हा**—लँकेशायरमधील वॉरिंग्टन येथील कापडाच्या गिरणीनें उत्पादन वाढविण्यासाठीं एका नवीन उपक्रमास आरंभ केला आहे. दिवसाची पाळी संपवून कामगार घरीं गेले कीं त्यांच्या बायका फक्त ४ तास काम करण्याकरतां गिरणींत येतात. ज्या बायकांना घरांतील कामें संभाळून गिरणींत पूर्ण वेळ काम करतां येणें शक्य नसतें त्यांना ह्या उपक्रमाचा चांगला फायदा होतो. शिवाय ब्रिटनच्या निर्यात-वाढीच्या धोरणासाठी अधिक उत्पादनही होतें.

# अर्थ

बुधवार, ता. ४ जानेवारी, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पाकिस्तानचें आयात–निर्यात धोरण

पाकिस्ताननें आपल्या रुपयाची किंमत कमी न करण्याचा निर्णय घेतला त्यामुळें त्या राष्ट्राला आपल्या व्यापारविषयक धोरणांतही फेरबदल करावा लागला आहे. पौंडाच्या गटांतील राष्ट्रांनी आपआपल्या चलनांचीं मूल्यें उतरविल्यामुळें पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवरही विपरीत परिणाम होऊं लागणार असें दिसत आहे. केवळ पाकिस्तानपुरताच विचार करावयाचा तर त्या राष्ट्राला आपल्या रुपयाचें अवमूल्यन करण्याचें कांहीं कारण नव्हतें; कारण, पाकिस्तान पौंडाच्या गटांतील राष्ट्रांतून आयातीपेक्षां निर्यात अधिक करीत असतो. डॉलर्सच्या कक्षेंतील राष्ट्रांतही पाकिस्तानची निर्यातच अधिक होते. तेव्हां पाकिस्तानी रुपयाचें अवमूल्यन केल्यानें आयात मालाची किंमत वाढली असती. उलटपक्षीं पाकिस्तानच्या निर्यात व्यापारांत वाढ झालीच असती असें मात्र नाहीं. पाकिस्तानांतून निर्यात होणाऱ्या मालाला अधिक मागणी येण्याचा संभव नाहीं. ह्या मालाला अवमूल्यनापूर्वीही चांगली मागणी होतीच. अशा परिस्थितींत अवमूल्यन केल्यानें चलनवाढीला मात्र उत्तेजन मिळालें असतें. पाकिस्तान सरकार सध्या औद्योगीकरणाच्या मोठ्या कार्यक्रमाला प्रारंभ करीत आहे. अशा वेळीं अवमूल्यन केलें असतें तर परदेशांतून आयात कराव्या लागणाऱ्या भांडवली स्वरूपाच्या मालाला अधिक चढत्या किंमती पाकिस्तानला द्याव्या लागल्या असत्या.

हा सर्व युक्तिवाद ठीक आहे. परंतु ज्या देशाची भरभराट मुख्यत: त्याच्या निर्यात व्यापारावर अवलंबून आहे, त्यानें आर्थिक बाबतींत एकांडेपणानें वागणें परवडण्यासारखें नाहीं. खरा प्रश्न असा आहे कीं, पाकिस्तानचा निर्यात व्यापार कितपत अधिक वाढूं शकेल? ताग, कापूस, चहा, लोकर, कच्ची आणि कमावलेलीं कातडीं हा माल पाकिस्तानांतून मुख्यत: निर्यात होतो. ह्या मालाच्या निर्यातीमुळेंच पाकिस्तानला परकीय हुंडणावळ मिळते. निर्यात मालावरील जकातींचें उत्पन्नही बरेंच मिळतें. पाकिस्तानच्या निर्यातीपैकीं फार मोठा हिस्सा अशा देशांत जातो कीं ज्यांनीं आपल्या चलनाची किंमत कमी केली आहे. १९४८-४९ सालीं समुद्र–मार्गानें होणाऱ्या निर्यातीपैकीं ४२ टक्के माल हिंदुस्थानला आणि ब्रिटनला गेला पण येवढ्यानेंच संपलें नाहीं; हिंदुस्थानला खुष्कीच्या मार्गानें जी निर्यात पाकिस्तान करतो, तिची किंमतच समुद्रमार्गानें होणाऱ्या निर्यातीच्या किंमती इतकी जवळजवळ आहे.

पाकिस्तानला आपल्या मालाची किंमत कमी न करतां तो विकतां आला तर, त्या मालाच्या किंमती घसरण्याचें कारणच नाहीं. पण हें साधणार कसें हाच मुख्य प्रश्न आहे. पाकिस्तानच्या व्यापार खात्यानें, निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यांना निर्यात वाढविण्याचा सल्ला दिला आहे. परंतु माल विकत घेणाऱ्या राष्ट्रांनीं आपल्या चलनाच्या किंमती उतरविल्या असल्यामुळें त्यांना पाकिस्तानच्या मालाला पूर्वीपेक्षां ४४ टक्केपर्यंत अधिक किंमती द्याव्या लागतील. तेव्हां ह्या गिऱ्हाइकाचें मन अधिक किंमत देण्यास कसें वळवावयाचें? ह्या मालावरील निर्यात जकात पाकिस्तान सरकार रद्द करील, निदान कमी करील, अशी अपेक्षा करण्यांत येत होती पण ती फोल ठरली. सध्या कापसाच्या प्रत्येक गासडी मागें ६० रुपये आणि तागाच्या गासडी मागें २० रुपये निर्यात कर घेण्यांत येतो. ह्या करांत कांहीं कपात करण्यांत आलेली नाहीं. आखूड धाग्याच्या कापसावरील निर्यात कर मात्र गासडी मागें ६० रुपयांवरून ४० रुपयांपर्यंत उतरविण्यांत आला आहे.

पाकिस्तानचें हें धोरण टिकून राहीलच असें मात्र म्हणतां येणार नाहीं. कापूस आणि ताग ह्यांचा पुरवठा कमी आहे आणि त्यांच्या किंमतीही फार चढलेल्या आहेत. त्यामुळें त्या किंमतींत थोडी घट झाली तरी ती सोसतां येण्यासारखी आहे. शिवाय डॉलर्सच्या प्रचलित टंचाईमुळें पाकिस्तानचा कापूस अमेरिकन कापसाशीं स्पर्धा करूं शकेल. (अमेरिकन कापसापेक्षां पाकिस्तानच्या कापसाच्या किंमती १६ टक्के अधिक आहेत.) तागाची परिस्थिति मात्र चिंताजनक आहे. पाकिस्तानच्या तागाच्या उत्पादनापैकीं निम्म्यापेक्षां अधिक ताग हिंदुस्थानांतील गिरण्या घेतात. पाकिस्तान मागीत असलेली किंमत देण्यास हिंदुस्थान तयार नाहीं. अर्थात् तागाच्या किंमती उतरणार ह्याची जाणीव पाकिस्तान सरकारलाही आहे. तथापि, तागाच्या किंमती उतरणें न उतरणें तागाच्या उत्पादनावर अवलंबून आहे. पाकिस्तान सरकारचा तागाच्या उत्पादनाचा ताजा अंदाज ३३,००,००० गासड्या इतकाच आहे. पूर्वीचा अंदाज ५५,००,००० गासड्या होता. हे आकडे वस्तुस्थितीस धरून असतील तर तागाचा पुरवठा अपुरा पडून मागणी वाढेल आणि किंमती एकदम खाली येणार नाहींत.

तेव्हां, निर्यातीचें धोरण पाहिलें तर पाकिस्तान आपलीं पावलें धिटाईनें टाकीत आहे असें दिसतें. उलट पक्षीं, आयात व्यापाराबद्दल मात्र तें सरकार फारच सावधगिरीनें वागत असल्याचें दिसतें. पाकिस्तानच्या रुपयाचें अवमूल्यन न करण्यांत एक हेतू असा होता कीं, आयात माल स्वस्त पडावा आणि रहाणीच्या खर्चाचा निर्देशांक खालीं यावा. ह्या हेतूला अनुसरून पाकिस्तान सरकार आयात मालाला मुक्तद्वार देईल अशी अपेक्षा होती. परंतु ही अपेक्षा चुकीची ठरली. पाकिस्ताननें पूर्वीचा खुला परवाना रद्द करून आयात व्यापारावर आतां नियंत्रणें घातलीं आहेत.

---

आगपेट्यांचा धंदा—हिंदुस्थानांत काड्यांच्या पेट्या तयार करणारे २०० कारखाने आहेत. सर्व कारखाने मिळून वार्षिक ४ कोटी ग्रोस काड्यांच्या पेट्यांचें उत्पादन करतात. कारखान्यांपैकीं ५ कारखाने पूर्णपणें यांत्रिक पद्धतीचे आहेत; २५ कारखान्यांतून अंशत: यांत्रिकीकरण झालेलें आहे, आणि बाकीचे छोट्या ग्रामोद्योगासारखे आहेत. असे कारखाने मुख्यत: दक्षिण हिंदुस्थानांत आहेत. काड्यांच्या पेट्या तयार करण्यासाठीं लागणारें योग्य प्रकारचें लांकूड पुरेसें मिळत नसल्यानें अंदमान बेटांतून लांकूड आणण्याचे प्रयत्न हिंदुस्थान सरकार करीत आहे. काड्यांच्या पेट्यांच्या कारखान्यांना दरवर्षीं जवळ जवळ ६० लाख घनफूट लांकूड लागतें.

## राष्ट्रीय आर्थिक योजनांत सहकारी बँकांचें महत्त्वाचें स्थान

### खेडेगांवी प्रदेशांतील बँकिंगचा प्रसार

( श्री. वा. पु. वर्दे, बी. कॉम., ऑनररी सेक्रेटरी, मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिटयूट )

आपल्या बचतींमधून जमीन, सोनें–चांदी किंवा बैल विकत घेण्याची शेतकऱ्यांची स्वाभाविक प्रवृत्ति असते. तरी सुद्धा, त्यांतल्या त्यांत पैसेवाले जमीनदार आपल्या बचतींचे पैसे बँकांतून गुंतविण्याची प्रवृत्ति दाखवूं लागले आहेत. सहकारी बँकांच्या व त्यांच्या शाखांच्या प्रांतभर पसरलेल्या जाळ्यामुळें सामान्य शेतकऱ्यांचाहि बँकिंगशीं थोडाफार परिचय झालेला आहे आणि त्यांच्या वाढत्या मिळकतीचा कांहीं अंश तरी सहकारी बँकांकडे ठेव म्हणून येत आहे. कर्जांना आतां पूर्वीप्रमाणें मागणी नाहीं, सहकारी बँका व सोसायट्या ह्यांचे जवळील सभासदांच्या ठेवींत वाढ झाली आहे आणि थकबाकीचें प्रमाण उतरलें आहे. ह्यांवरून, शेतकऱ्यांना बचतीचा उत्पादक उपयोग करण्याचें महत्त्व पटलें आहे, असें दिसून येतें.

### व्यापारी बँका आणि शेतकऱ्यांच्या गरजा

व्यापारी बँका किंवा त्यांच्या शाखा ह्यांचा खेडेगांवी मुलुखांत सामान्यतः प्रसार झालेला नाहीं. त्यांनीं शेतकऱ्यांच्या ठेवी स्वीकारल्या, तरी शेतकऱ्यांना त्या कर्जें देऊं शकत नाहींत. कारण, शेतीविषयक कर्जांचें स्वरूपच वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामुळें, खेडेगांवांतील जनतेची साठणारी थोडीफार बचत तेथून घेऊन तिचा विनियोग मोठ्या शहरांतील व्यापारी गरजा भागविण्याकडे होतो.

### सहकारी बँका आणि शेतकऱ्यांच्या गरजा

खासगी सावकार सोडले, तर शेतकऱ्यांच्या बँकिंगच्या गरजा भागविणाऱ्या सहकारी बँकांखेरीज दुसऱ्या संस्था नाहींत. शेअर–भांडवल, ठेवी, कर्जें, इत्यादींच्या तंत्रांशीं शेतकऱ्यांचा परिचय ह्या बँकाच घडवून आणतात. बँकिंगच्या सोईची जेथें तीव्रतेनें गरज भासत आहे, अशा खेडेगांवी ठिकाणीं प्रांतिक सहकारी बँक व जिल्हा सहकारी बँका आपले व्यवहार सुरू करतात; त्यामुळें वाढणाऱ्या खर्चाचा पुष्कळ वेळा त्या विचारहि करीत नाहींत. मुंबई प्रांतांत, सर्व पतवाल्या शेतकऱ्यांना कर्जें देण्याची जबाबदारी सहकारी बँकांनीं पत्करली आहे आणि त्यामुळें आज त्यांचा व खेडेगांवी जनतेचा जो संबंध आहे, तो आतां सर्वत्र अधिकच जिव्हाळ्याचा होईल.

### बँकिंगच्या सोईंची वाढ

कर्जें आणि ठेवी, ह्या बँकिंगच्या मुख्य सोई आहेत; बाकीच्या आनुषंगिक आहेत. शेतकऱ्याजवळ जी कांहीं शिल्लक बचत आहे, ती खर्चून जाऊं नये, ही गोष्ट व्यक्तिशः शेतकऱ्याच्या, त्याचप्रमाणें खेडेगांवी आर्थिक जीवनाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची आहे. बँकांतील ठेवींचा प्रश्न ओघानेंच येतो. शेतकऱ्याला त्याची सर्व बचत स्थानिक सहकारी सोसायटींत ठेवण्यास उद्युक्त करावें, कारण हीच सोसायटी त्याच्या गरजेप्रमाणें ठेव परत करील. इतकेंच नव्हे तर त्यास कर्जहि देईल. शेतकऱ्यांशीं अशा प्रकारचा संबंध जोडणें व्यापारी बँकांना शक्य होणार नाहीं. म्हणून, खेडेगांवी प्रदेशांत सहकारी बँकांची वाढ करण्याचा प्रयत्न अवश्य केला पाहिजे. धान्यवसुली, दुर्मीळ जिनसांचें वाटप, अधिक धान्य पिकवा मोहीम, सावकारी नियंत्रणामुळें उद्भवणाऱ्या अडचणींना तोंड देण्यासाठी उपाययोजना, इत्यादि अनेक आर्थिक योजनांनीं राष्ट्रीय आर्थिक योजनांत सहकारी बँकिंगचें विशेष स्थान पटवून दिलें आहे.

### बँकिंगच्या प्रगतीस अडथळे

व्यापारी बँका खेडेगांवी प्रदेशांत कोणतें कार्य करूं शकणार? त्या तेथील जनतेच्या बचती फक्त गोळा करूं शकतील, परंतु, गुंतवणुकीपुरताच विचार करून भागेल एवढा ज्यादा पैसा त्या जनतेजवळ नसतो. त्यांची बचत सुरक्षित राहून त्याचे आधारावर त्यांना कर्जहि मिळालें पाहिजे. व्यापारी बँकेचें स्वरूपच असें असतें कीं तिचेकडून शेतकऱ्यांना कर्ज मिळण्याची अपेक्षा नाहीं. साध्या शेतकऱ्यांशीं आपुलकीनें वागतां येईल, असें व्यापारी बँकांच्या नोकरवर्गाचें शिक्षण व दृष्टिकोन हीं नसतात; पुष्कळशा लहान लोकांकडून किरकोळ धंदा मिळविण्याचा खास प्रयत्न ते करण्याचा संभव नाहीं. खेडेगांवांतील लोकांचा सहकारी संघटनेशीं परिचय आहे; ह्या संघटनेनें बऱ्या–वाईट, सर्व काळांत त्यांचें हित सतत पाहिलेलें आहे. तिचें लोकशाही स्वरूप त्यांना माहीत आहे; जो कांहीं थोडा–फार बँकिंगचा व्यवहार त्यांचा असेल तो देतांना सहकारी बँकांनाच प्राधान्य मिळेल, हें उघड आहे. व्यापारी बँकांना मुद्दाम आर्थिक मदत देऊन त्यांचा खेडेगांवी प्रदेशांत प्रवेश करविणें अनवश्यकच केवळ नसून, तें खेडेगांवी प्रदेशास निश्चित घातुक होईल. कारण, सहकारी बँकांनीं अगोदरच बँकिंगच्या सोईचें जाळें तेथें पसरलेलें आहे. सहकारी बँकाच वाढल्या तर हव्या आहेत; सरकारी मदत देण्यांत येणाऱ्या किंवा न येणाऱ्या व्यापारी बँका तेथें नकोत.

### सहकारी बँकिंगची वाढ

ह्या प्रांतांत सहकारानें बरी प्रगति केली आहे, परंतु सहकारी चळवळीजवळील अथवा प्रांतिक सहकाराजवळील मर्यादित पैसा-पुरवठ्यामुळें पुढील प्रगतीस खंड पडला आहे असें सरकारास आढळून आलें, तर हिंदुस्थान सरकारनेंच, राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें मदतीस यावें. निदान त्यानें सरकारी मदत देऊन स्पर्धामय अशी व्यापारी बँक किंवा नवी सरकार–पुरस्कृत बँक तरी काढूं नये. सरकारचा कोणताहि वाजवी हेतु सहकारी संघटना साध्य करून देऊं शकेल. केंद्रीय सहकारी बँकेकडे कांहीं रक्कम बिनव्याजी ठेवल्यास, ती बँक आपल्या शाखा व संबंधित संस्था ह्यांचेमार्फत खेडेगांवी प्रदेशांत आपल्या बँकिंगच्या सोईचा प्रसार करूं शकेल.

### सहकारी बँका व रिझर्व्ह बँक

सहकारी बँका व्यापारी बँकांचे व्यवहारक्षेत्रांत जात असल्याचा वाद रिझर्व्ह बँकेच्या ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्यानें निष्कारण उपस्थित केला आहे. हिंदी बँकिंग क्षेत्रांत सहकारी बँका उचलित असलेल्या वाट्याच्या टीकेकडे त्यांनीं लक्ष देत बसण्याची कांहींही आवश्यकता नाहीं. १९२१ सालाइतक्या पूर्वीच्या काळींच तेव्हांचे रजिस्ट्रार मि. ऑटो रॉथफील्ड ह्यांनीं सहकारी बँकांपुढें राष्ट्रीय सेवेचा आदर्श ठेवला, त्याप्रमाणें त्या बँका तेव्हांपासून कार्य करीत आल्या आहेत. सहकारी बांधवांना कर्जाच्या वाजवी सोई नाकारून त्या बँका व्यापारी व्यवहारांत पडतात किंवा काय, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. हें सिद्ध न करतां सहकारी बँकांविरुद्ध ॲ. क्रे. खात्यानें काढलेले उद्गार समर्थनीय ठरणार नाहींत.

### ट्रेझरीचें काम

सध्या ज्या ठिकाणीं इंपीरिअल बँक ट्रेझरीचें काम करते, तेथें तिनेंच तें चालू ठेवण्यास हरकत नाहीं. रिझर्व्ह बँक व इंपीरिअल

बँक ह्यांच्या शाखा वगळून बाकीच्या ठिकाणीं तें काम सहकारी संस्थांकडे सोपवावें. मुंबई प्रांतांत तें मुंबई प्रांतिक सहकारी बँकेस दिल्यास, ती तें आपल्या शाखा व संबंधित संस्था ह्यांचेमार्फत पार पाडील. कांहीं केंद्रांचे ठिकाणीं सरकारी आर्थिक मदत अर्थात लागेलच. नव्या शाखा उघडण्यासाठी आज प्रांतिक सरकार सहकारी बँकांना मदत देत आहेच; त्याच धर्तीवर ही मदत द्यावी लागेल. कांहीं झालें तरी, व्यापारी बँकांना हें सार्वजनिक स्वरूपाचें काम देण्याचें मुळीच प्रयोजन नाहीं.

(रूरल बँकिंग चौकशी कमिटीकडे इन्स्टिट्यूटनें पाठविलेलें निवेदन)

---

### बँकेच्या कॅश बॉक्सवर हल्ला

सेंट्रल बँक ऑफ इंडियाची मुंबईतील मुख्य कचेरी दररोज सकाळीं तिच्या सहा शाखांना पेट्यांतून रकमा पुरविते. बुधवार ता. २८ डिसेंबर रोजीं अशा रीतीनें ६ पेट्यांत मिळून ३० लक्ष रुपये होते. शेवटची पेटी जेव्हां सँढहर्स्ट रोड शाखेजवळ आली, तेव्हां ती ९-५५ वाजतां सशस्त्र गुंडांनीं मारहाण करून पळवली. तिच्यांत ५,६०,००० रु. होते. कांहीं संशयितांना अटक करण्यांत आली आहे.

---

### सहकारी संघटनाच सोयस्कर : सारस्वत को. बँकेचें मत

खेडेगांवी जनतेची कर्जाचा सोय करण्यास सहकारी बँकाच उपयुक्त आहेत; प्रत्येक प्रांतांत केंद्रीय: सहकारी बँकेकडे हें काम द्यावें व तिनें तें स्वतःच्या शाखा व संबंधित संस्था: ह्यांचेमार्फत पार पाडावें, असें मत मुंबईच्या सारस्वत को. बँकेच्या डायरेक्टर बोर्डानें रूरल बँकिंग चौकशी कमिटीस कळविलें आहे.

---

### बँकेच्या कामासाठी येणार : जुन्या मित्रांना भेटणार

फील्ड मार्शल सर क्लॉड ऑचिनलेक हे ग्रिंडलेज बँकेचे एक डायरेक्टर आहेत. बँकेच्या भारतांतील व पाकिस्तानांतील शाखांस भेट देण्यासाठी ते येथें आले आहेत, परंतु वायव्य सरहद्दीवरील आणि पश्चिम पंजाबांतील जुन्या मित्रांना ते भेटून जाणार आहेत.

---

### पूर्व बंगालमधील बँका

गैरशिस्त व्यवस्था आणि तारण न घेतां भरमसाट कर्जें, ह्यांमुळें पूर्व बंगालमधील ६ बँकांचे व्यवहार बंद पडले आहेत. ढाका हायकोर्टानें त्यांना मुदत दिली आहे, त्यांपैकी बँक ऑफ कॉमर्सची मुदत जानेवारी, १९५० पर्यंतच आहे. बाकीच्यांनीं ठेवींच्या परतफेडीसाठी योजना तयार करून हायकोर्टाकडे पाठविल्या आहेत.

---

### हिंदी खाणींचा धंदा

| | १९४६ | १९४७ |
|---|---|---|
| एकूण कामगारांची रोजची सरासरी | ४,००,३७६ | ४,०७,२६३ |
| त्यापैकी स्त्री-कामगार | ८१,२५० | ९१,२५० |
| कोळशाच्या खाणींतील कामगार | ३,२७,०५६ | ३,२१,५३७ |
| कोळशाचें उत्पादन (टन) | २,६२,९७,५८४ | २,६८,९२,८९३ |
| मँगेनीजचें उत्पादन (टन) | १,८४,२७४ | ३,१४,५४० |

---

## किर्लोस्कर बंधु लि.

### ताळेबंदांतील प्रमुख आकडे

(३१-७-१९४९)

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १५,४६,६८२ | इमारती | ११,२१,७७७ |
| रिझर्व्ह व इतर फंड | २३,२९,४०६ | मशिनरी | १८,७७,५८३ |
| घसारा | २३,६०,८४२ | विजेसाठी उभारणी | १,६७,९९७ |
| प्रॉ. फंड | ८,५५,५०३ | डेट स्टॉक | १,८१,९९७ |
| कर्जें व ठेवी | ८,६९,९९९ | स्टोर्स इ. | २७,४२,७२० |
| देणीं | २६,७९,८७८ | तयार व चालू माल | १४,४४,५३४ |
| निव्वळ नफा | १,८५,१९९ | येणीं | ८,३६,०६१ |
| | | आ. दिलेल्या रकमा | ६,४७,८२७ |
| | | प्रॉ. फंड गुंतवणूक | ७,६४,८१५ |
| | | शेअर्स | ६,५९,५१५ |
| | | रोख व बँकांत | ३,८९,६१७ |

### डिव्हिडंडचें सातत्य

किर्लोस्कर बंधु लि. नें आपल्या २९ वर्षांपैकीं २४ वर्षें डिव्हिडंड दिलें आहे. कमींत कमी डिव्हिडंड ४% असून जास्तींत जास्त १२% आहे. १९२०-२१ पासून १९४७-४८ अखेरच्या २३ वर्षांच्या डिव्हिडंडची सरासरी ६·५% पडते व प्रारंभापासूनच्या भागीदारांस त्यांच्या भागांवर एकूण १८२⅓% डिव्हिडंड मिळालें आहे. त्यांत आतां १२% ची भर पडत आहे.

### गेल्या वर्षाचा आढावा

कंपनीच्या १ कोटी, ११ लक्ष रुपयांच्या ताळेबंदापैकीं सुमारें ६२⅓ लक्ष रुपयांचें भांडवल कंपनीचें स्वतःचें आहे, ही महत्त्वाची गोष्ट सहज लक्षांत येण्याजोगी आहे. घसाऱ्याची तरतूद भरपूर केलेली आहे. ३१ जुलै, १९४९ अखेरच्या वर्षी कंपनीस १,८५,१९९ रु. नफा झाला, त्यापैकीं १,८३,५०० रु. ६% डिव्हिडंड + ६% बोनस देण्यासाठी लागणार आहेत. मूळ वेतनाच्या एकपंचमांशाइतका बोनस कामगारांना कामाच्या दिवसाच्या कांहीं अटींवर, देण्याचें ठरलें आहे. अहवालाचे वर्षी डायरेक्टरांनीं १५ हजारांच्या देणग्या दिल्या, त्यांपैकीं सर्वांत मोठी म्हणजे १० हजारांची देणगी सांगलीच्या नव्या एंजिनिअरिंग कॉलेजला मिळाली आहे.

### मॅनेजिंग एजंटांची फेरनेमणूक

किर्लोस्कर सन्स आणि कं. कडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे, तिचा करार १५ जानेवारी, १९५० रोजीं संपत आहे. त्यापुढें आणखी २० वर्षांकरितां त्यांची फेरनेमणूक करणारा स्पेशल ठराव वार्षिक सभेनें ता. २७ डिसेंबर रोजीं सम्मत केला आहे.

---

### श्री. आत्मारामपंत ओगले ह्यांचें निधन !

ओगलेवाडीचे संस्थापक व सुप्रसिद्ध ध्येयनिष्ठ व कर्तबगार कारखानदार श्री. श्रीपाद प्रभाकर उर्फ आत्मारामपंत ओगले हे ओगलेवाडी येथें रविवार, दि. १ जानेवारी, १९५० रोजीं मृत्यु पावले, हें नमूद करण्यास दुःख होतें. त्यांच्या मृत्यूमुळें महाराष्ट्रीय कारखानदारीचा एक उत्कृष्ट आदर्श नाहींसा झाला आहे. कै. आत्मारामपंतांचे कित्येक लेख "अर्था" मध्यें प्रसिद्ध झालेले आहेत, ते वाचकांस स्मरत असतीलच.

## दि प्रॉ. इंडस्ट्रिअल को. असोसिएशन लि., मुंबई

### उपयुक्त कार्याचा आढावा

सूत वांटपाचें काम हें असोसिएशनच्या जून, १९४९ अखेरच्या वर्षांतील सर्वांत मोठें काम होतें. ह्यासाठी असोसिएशननें प्रांतिक सहकारी बँक व सेंट्रल बँक ऑफ इंडिया ह्यांचेकडून घ्यावयाच्या १ कोटी, २५ लक्ष रुपयांपर्यंतच्या कर्जाच्या २०% मार्जिनची हमी मुंबई सरकारनें घेतली होती. असोसिएशननें ४ कोटी, २६ लक्ष रुपयांचें सूत विकत घेतलें व ३ कोटी, ३५३/४ लक्ष रुपयांचें सूत विकलें. ह्या व्यवहारांत ८५,२४१ रु. नफा उरला. एप्रिल, १९४९ नंतर जिल्ह्यांतून सुताचा साठा वाढूं लागला. इंडेंट पद्धतीवर सहकारी सूत वाटप योजना पुरी करण्याचा असोसिएशनचा प्रयत्न आहे. ठाणें, कुलाबा व नाशिक जिल्ह्यांतील पांच सोसायट्यांना असोसिएशननें लाकूड व कोळसा विक्रीचे कामीं सहाय्य केलें. असनगांव, कर्जत, पुणें व नाशिक येथें कोळशाचे डेपो उघडण्यांत आले. वांद्रा येथील एक व पंचमहाल जिल्ह्यांतील तीन कातडी कमावण्याच्या सोसायट्या व सातारा जिल्ह्यांतील एक चर्मकारांची सोसायटी ह्यांचें स्वरूप आदर्श करण्याचा प्रयत्न चालू आहे. हिरडा जमवून विकण्याचा असोसिएशनचा उपक्रम कातडी कमावणाऱ्या सोसासट्यांना उपयुक्त ठरला आहे. कमावलेली कातडीं विक्री करण्याचे कामींहि सहाय्य दिलें जात आहे. मशिनरी, लोखंड, पोलाद, धातूंचे पत्रे, गळिताचीं धान्यें, इत्यादि खरेदी करून जरूरीप्रमाणें उत्पादक सोसायट्यांनी दिलीं जातात आणि कापड, मध, कातडी माल, फॅन्सी माल, इत्यादि माल विकण्यांत येतो. मुंबई येथील सरकारी विक्री डेपो असोसिएशनकडे चालविण्यासाठी १–१–४९ पासून आला आहे, परंतु तेथील मालाची किंमत २५% ते ३५% पर्यंत उतरत चालली आहे. पुणें, पंचमहाल, ठाणें, कुलाबा, आणि रत्नागिरी ह्या जिल्ह्यांत असोसिएशनच्या शाखा काम करीत आहेत. १९४८–४९ सालासाठी सरकारकडून असोसिएशनला ५९,७१० रु. ग्रँट मिळाली होती, परंतु १९४९–५० साठी ग्रँट न मागण्याचें डायरेक्टरांनीं ठरविलें आहे. श्री. डी. एम. खटाव व श्री. लालचंद हिराचंद हे असोसिएशनचे अनुक्रमें चेअरमन व व्हाइस चेअरमन असून श्री. एल. एन. रेणू हे ऑनररी सेक्रेटरी आहेत. ते बोर्डाचे व त्यानें नेमलेल्या सर्व कमिट्यांचे सभासद असून दररोज तीन तास ते कचेरीचें काम पहातात. असोसिएशनच्या सर्वच कार्यांत त्यांच्या सहाय्याचा वांटा फार फार मोठा आहे. औद्योगिक सहकाराच्या प्रगतीसाठी ते पुष्कळच परिश्रम करतात. असोसिएशनचे पटावर २९६ सभासद आहेत; त्यांपैकी १७० उत्पादकांच्या सोसायट्या व जिल्हा इं. असोसिएशन्स आहेत. वसूल भांडवल २,११,८९० रु. असून एकूण ताळेबंद १ कोटी, २३/४ लक्ष रुपयांचा आहे. ताळेबंदाकडे वर्ग केलेला नफा १,२४,७२० रु. आहे. नियंत्रित सुताचें वांटप हा असोसिएशनचा नित्याचा व्यवहार नसल्यामुळें, नफावांटणीपूर्वी अशा नफ्याचा कांहीं भाग स्पेशल रिझर्व्हमध्यें टाकावा, अशी जॉ. रजिस्टार, इं. को. अँड व्हि. इं. ची शिफारस आहे. त्याप्रमाणें कानू बदलल्यावर नफावांटणीची शिफारस करण्यांत येईल.


## दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ४१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४३,००,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर



## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

फोन नं. २४८३ — तारेचा पत्ता "Cencobank" — पोस्टबॉक्स नं. ५११

मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे

मॅनेजिंग डायरेक्टर

## विमा व्यवसायाचा वार्षिक आढावा
## (२)

### आयुर्विम्यांतील रक्कम

भारतीय विमा संस्थांनीं १९४८ मध्यें एकंदर ४,६७,००० विमा–पत्रें पुरीं केलीं त्यांची एकूण रक्कम १०७·६८ कोटी रुपये असून हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न ५·५७ कोटी रुपये होतें. हे आंकडे गतवर्षीच्या मानानें विमापत्रांच्या संख्येच्या बाबतींत १७,००० नीं विमा–रकमेच्या बाबतींत ६·३८ कोटी रुपयांनीं, व हप्त्यांच्या उत्पन्नाचे बाबतींत ०·४५ कोटी रुपयांनीं कमी आहेत. परदेशी संस्थांचे बाबतींत हेच आंकडे अनुक्रमें १९,००० विमापत्रें, ११·९७ कोटी रु. विमा–रक्कम आणि ७१ लक्ष रुपये हप्त्यांचें उत्पन्न असें असून गतवर्षीच्या मानानें हे थोडेसे कमीच आहेत.

१९४८ च्या अखेरीस भारतांत भारतीय विमासंस्थांत चालू असलेलें एकंदर काम, २७,९१,००० विमा–पत्रें, ५६६·३८ कोटी रुपये विमा रक्कम व २७·५९ कोटी रुपये हप्त्यांचें उत्पन्न असें होतें. गतवर्षीच्या मानानें हे आंकडे अनुक्रमें ८४,००० विमापत्रें, १९·२१ कोटी रु. व ६१ लक्ष रुपयांनीं अधिक आहेत. परदेशी विमासंस्थांचे बाबतींत हेच आंकडे अनुक्रमें २,३४,००० विमा–पत्रें, १०१·०८ कोटी रु. विमा–रक्कम व ५·६८ कोटी रुपये हप्त्यांचें उत्पन्न असें होतें. गतवर्षीच्या मानानें हे विमा–पत्रांचे बाबतींत ५,००० नीं वाढलेलें असून विमा रक्कम व हप्त्यांचें उत्पन्न यांचे बाबतींत ८२ लक्ष रु. व १५ लक्ष रुपयांनीं जास्त आहेत.

भारतीय विमा संस्थांनीं भारताबाहेर १९४८ मध्यें केलेलें एकूण काम व त्या वर्षअखेर पर्यंतचें चालू काम अनुक्रमें २१,००० विमा–पत्रें, ७·०४ कोटी रु. विमा–रक्कम आणि २,०२,२०० विमा–पत्रें व ४५·३० कोटी रु. विमा–रक्कम असें आहे.

आयुर्विम्याच्या बाबतींत भारतीय व परदेशी विमा–संस्थांचें १९४८ मध्यें एकूण उत्पन्न अनुक्रमें ३७·५० कोटी रु. व ७·४३ कोटी रु. होतें. हक्कपूर्ति व सोडकिंमत यासुद्धां सर्व प्रकारांमिळून खर्च झालेली एकूण रक्कम अनुक्रमें २०·०१ कोटी रु. व ६·६३ कोटी रु. होती म्हणजे १७·४९ कोटी रु. व ८० लक्ष रु. ही शिल्लक भारतीय व परदेशी विमा–संस्थांच्या आयुर्निधींतील वाढ दिग्दर्शित करते.

### व्याजाचें प्रमाण घसरलें : खर्चाचें प्रमाणही कमी

भारतीय विमा–संस्थांच्या आयुर्निधीवरील प्राप्तीकर वजा जातां व्याजाचा दर सरासरीनें ३·०२ टक्के पडला. आधींच्या वर्षी तो ३.०३ टक्के पडला होता. हप्त्याच्या उत्पन्नाशीं टक्केवारीनें पाहतां खर्चाचें मान २९.० टक्के एवढेंच पडलें. आधींच्या वर्षी तें ३०.४ टक्के होतें.

परदेशी विमा–संस्थांचे बाबतींत हेच आंकडे अनुक्रमें ३.१५ टक्के व २१.१ टक्के होते. आधींच्या वर्षी तेच ३.१० टक्के व २०.० टक्के होते.

### मूल्यमापनांचें पृथक्करण

या वार्षिकांत प्रसिद्ध करण्यांत आलेल्या भारतीय विमा–संस्थांपैकीं ३४ संस्थांच्या नव्या मूल्यमापनांपैकीं २५ त शिल्लक दिसून आली. यांपैकीं ९ संस्थांनी ही शिल्लक विमेदार व भागीदार यांचेमध्यें वांटली व बाकीच्यांनीं खर्च करतां पुढील हिशेबांत जमा केली. नऊ संस्थांचीं मूल्यमापनें तोट्याचीं आढळून आलीं. यांपैकीं चार संस्थांनीं ही तूट आपल्या वसूल झालेल्या भांडवलांतून भरून काढली तर इतरांचे बाबतींत ती भरून येऊं शकलेली नाहीं.

## सामार पोच

### किर्लोस्कर शरीर संवर्धन विशेष अंक

किर्लोस्कर मासिकाचा जानेवारी, १९५० चा अंक शरीर संवर्धन विशेषांक म्हणून प्रकाशित झाला आहे. अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद व अखिल भारतीय शारीरिक शिक्षण परिषद ह्यांचीं अधिवेशनें पुणें येथें होत आहेत, त्यास अनुसरून प्रस्तुत विशेषांक प्रसिद्ध करण्यांत आला आहे. व्यायाम व शारीरिक शिक्षण ह्यांच्या संघटनेचें महत्त्व समजावून सांगण्याची महत्त्वाची कामगिरी हा अंक निश्चितपणें करील. स्वतःचें शरीर सुदृढ केल्यानें स्वतःचा फायदा होतोच, परंतु त्याबरोबरच राष्ट्रहि बलवान होत असतें. तेव्हां, बलसंवर्धनासाठीं वास्तविक चळवळ करण्याचें प्रयोजन असूं नये. तथापि, तें आपल्या येथें आवश्यक आहे, हें मात्र खरें.

### शास्त्रीय संशोधनास चालना

भारतीय शास्त्रीय परिषदेचें ३७ वें अधिवेशन पुणें येथें सध्या चालू आहे. भारत सरकारनें देशभर स्थापन करण्याचें ठरविलेल्या ११ राष्ट्रीय प्रयोगशाळांपैकी पहिल्या (रासायनिक) प्रयोगशाळेचें उद्घाटन ३ जानेवारी रोजीं पुणें येथें पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनीं केलें. शास्त्रीय ज्ञानाचा औद्योगिक कार्यासाठीं उपयोग करण्यास मदत करणें, हें तिचें प्राथमिक कार्य राहणार आहे. शास्त्रीय परिषदेचा उद्देश शास्त्रीय संशोधनाला जोराची चालना देणें हा आहे. अशा रीतीनें, शास्त्रीय संशोधनाचें व ज्ञानाचें राष्ट्राच्या उद्धारांतील महत्त्वाचें स्थान ह्या दोन्ही घटनांनीं उत्कृष्ट रीतीनें दिग्दर्शित केलें आहे. प्रयोगशाळांत उच्च दर्जाचें काम सतत चालू राहून त्यांच्यामध्यें व उद्योगधंद्यांत क्रियाप्रवण दुवा कसा निर्माण होईल, इकडे लक्ष देण्यांत आलें पाहिजे. १९४१ सालीं आखण्यास प्रारंभ झालेल्या योजनेंतील पहिल्या प्रयोग शाळेची अद्याप इमारतहि पुरी झालेली नाहीं; ह्यावरून संशोधनाचें दृश्य फल दिसण्यास किती श्रम आणि काळ ह्यांची आवश्यकता आहे, हें लक्षांत येईल. योग्य दिशेनें पहिलें पाऊल ह्या दृष्टीनेंच नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचें आज स्वागत केलें पाहिजे.

### उद्बोधक उद्गार

### यंत्रीकरणाचें अर्थशास्त्र

"आधुनिक पद्धतीची यंत्रसामुग्री वापरूं लागल्यावर सुरुवातीला कामगारांची संख्या कमी होत असली तरी कालांतरानें ती वाढते. अनेक कारखान्यांत उत्पादनखर्च खालीं आल्यामुळें बहुसंख्य ग्राहकांना ह्या वस्तू घेता येणें शक्य होतें, आणि अशाप्रकारें मागणी वाढल्यामुळें कारखाने वाढतात व जास्त कामगारांना नोकरी मिळते. यंत्राच्या वापरामुळें, बेकार झालेल्या कामगारांच्या संख्येपेक्षां अशा प्रकारें काम मिळणाऱ्या कामगारांची संख्या जास्त आहे. अमेरिकेंतल्या कपडे (गार्मेन्ट) तयार करणाऱ्या कारखान्यांत जो अनुभव येतो, त्या आधारें हें विधान करतां येतें. विद्युत्शक्तीनें शिवण्याचीं यंत्रें चालतात. कामाच्या पद्धतींतही बदल झाला. त्यामुळें पूर्वी एकट्या न्यूयॉर्क सारख्या ठिकाणीं कपडे (फक्त स्त्रियांचे) तयार करणाऱ्या कारखान्यांत जेथें दहा हजार कामगार असत तेथें आतां १,००,००० कामगार काम करीत आहेत. शिवाय ह्या कारखान्यांना आवश्यक असा इतर माल पुरविण्याचें काम करणाऱ्या इतर धंद्यांत हजारों लोक काम करीत आहेत, ते निराळेच.":—इकॉनॉमिक कोऑपरेशन ॲडमिनिस्ट्रेशनचे मजूरविषयक सल्लागार, क्लिंटन एस. गोल्डन.

## पार्लमेंटांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

नव्या दिल्लींत एक आधुनिक पद्धतीचें हॉटेल बांधण्यांत येणार आहे. लोदी रोडवर हॉटेलच्या इमारतीसाठीं ८ एकर जागा राखून ठेवण्यांत आली आहे. हें हॉटेल काढण्यासाठीं निरनिराळ्या खाजगी कंपन्यांकडून टेंडरें मागविण्यांत आलीं होतीं. जास्तींत जास्त किंमतीचें टेंडर देणाऱ्या कंपनीशीं हिंद सरकारनें वाटाघाटी केल्या. दर एकराला ७०,००० रुपये ह्या दरानें असोशिएटेड होटेल्स ऑफ इंडिआ ह्या कंपनीकडून सर्वांत भारी टेंडर आलें व तें सरकारनें स्वीकारलें. टेंडर स्वीकारल्यापासून १८ महिन्यांच्या आंत हॉटेल चालूं व्हावें, असा सरकारचा मानस आहे.

× × ×

१९४८-४९ सालीं हिंदुस्थानांत एकूण ३,००,००० पौंड कोयनेलचा खप झाला. त्यापैकीं १,००,००० पौंड हिंदुस्थानांत तयार करण्यांत आलें आणि बाकीचें आयात करण्यांत आलें.

× × ×

हिंदुस्थानांत सध्या कापडाची टंचाई नाहीं. उलट, देशांतील कापडाचा खप कमी झाला असून कापडाच्या निर्यातींत वाढ झाली आहे. आक्टोबर २९ ह्या दिवशीं मुंबईमधील गिरण्यांतून ६७,००० कापडाच्या गांठी शिल्लक होत्या. अहमदाबादमधील गिरण्यांतून ८१,५०० गांठी पडून होत्या. सर्व हिंदुस्थानांतील गिरण्यांत मिळून २,७६,००० गांठी शिल्लक होत्या. मुंबईच्या शिलकींपैकीं १४ टक्के आणि अहमदाबादच्या शिलकींपैकीं १८ टक्के कापड तलम प्रकारचें होतें. जुलै १९४८ ते सप्टेंबर १९४८ च्या दरम्यान ५,९२,८५,००० रुपये किंमतीचें सूत आणि २,५९,४३,००० रुपये किंमतीचें कापड आयात झालें.

× × × ×

ब्रह्मदेशाकडून विकत घ्यावयाच्या तांदुळाच्या पोटीं हिंदुस्थान सरकारनें ब्रह्मदेशाला आगाऊ पैसे दिलेले नाहींत. हिंदुस्थानांतून ब्रह्मदेशांत पाठविलेल्या पैशासंबंधीं रिझर्व्ह बँकेकडून कांहीं सवलती देण्यांत आल्या, तशाच सवलती ब्रह्मदेशाकडून हिंदुस्थानांत पाठविलेल्या पैशासंबंधीं ब्रह्मी सरकारकडून मिळाल्या आहेत.

× × × ×

४ नोव्हेंबर १९४९ अखेर रिझर्व्ह बँकेनें निजामातर्फे ७०,५०० तोळे सोनें विकलें. त्याची एकूण किंमत दर तोळ्याला ११४ रु. ९ आ. ३ पै प्रमाणें ८०,७७,९६९ रुपये आली. हें सर्व सोनें निजामाची खाजगी मालमत्ता असल्यामुळें आलेली किंमत निजामाला देण्यांत आली.

× × × ×

निर्वासितांना स्थिरस्थावर करण्यासाठीं आतापर्यंत सुमारें १ कोटी, २४ लाख रुपये कर्जाच्या रूपानें देण्यांत आले.

× × × ×

हिंदुस्थानांतील साबणाचा खप दरवर्षी सुमारें १,२०,००० टन आहे आणि त्यांपैकीं बहुतेक साबण स्वदेशांतच तयार होतें. १९४८ सालीं १,९०,००० टन साबणाचें उत्पादन झालें. १९४९ च्या पहिल्या ९ महिन्यांत ९०,२३६ टन साबण तयार झालें. गल्या वर्षी १८३ टन साबण आयात करण्यांत झालें. ह्या वर्षीच्या एप्रिल ते ऑक्टोबर ह्या सात महिन्यांत १०६ टन साबण आयात करण्यांत आलें.

× × × ×

बेडेकर मसाले वापरा

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड
हेड ऑफिस : पुणें शहर
शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)
पे-ऑफिस:—खोपोली (जि. कुलाबा)
श्री. बी. बी. साल्वेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)
अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५
एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
श्री. रा. बा. साल्वेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

Dr. Waman Gopal's Sarsaparilla
BEST BLOOD PURIFIER

उंची कपड्याचा व स्नानाचा
उत्तम साबण
निर्मल सोप
दि माणिक सोप वर्क्स, कराड (सातारा)

हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व संपादक वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.